# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य लेखापरीक्षक यांचे कार्यालय

स्व.इंदीरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,

भाईंदर (प). ता.जि.ठाणे-401 101, दुरध्वनी क्र. 28192828


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.मनपा/मु.ले.प./मा.अ./४७ /2022-23

दि.७/ ०९ /2022

प्रति,

श्री. चंदन स सिंग

A-108, सिध्दि विनायक बिल्डिंग नं-01

Mbmc ward ऑफिस जवळ

तलाव रोड, भाईंदर (पु) 401105

विषयः- माहिती अधिकार अधिनियम- 2005

प्रभाग क्र.04 मध्ये केलेल्या लेखापरीक्षण अहवालची माहिती मिळणेबाबत..

(Information related to audit of prabhag no.04)

उपरोक्त संदर्भिय माहितीच्या अधिकारा अंतर्गत केलेल्या अपिलांच्या अनुषंगाने दि.16/09/2022 रोजी दुपारी 12.00 वाजता सुनावणी ठेवण्यात आलेली आहे.

तरी सदर सुनावणीस लेखापरीक्षण विभाग, 4 था मजला, मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, भाईंदर (प) येथे आपण उपस्थित रहावे.

(मंजिरी डिमेलो)

अपिलीय अधिकारी तथा

प्र. मुख्य लेखापरीक्षक

मिरा भाईंदर महानगरपालिका

O/C

प्रतः-

श्रीम चारुशिला खरपडे

जनमाहिती अधिकारी तथा

लेखापरीक्षा अधिकारी

# मिरा भाईंदर महानगरपालिका

जा.क्र.माअधि/अपिल/ 09 /2022-23
प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप-मुख्य लेखापरीक्षक
मिरा भाईंदर महानगरपालिका
स्व.इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प)
ता.जि.ठाणे-401101, दुरध्वनी क्र : 28192828
Email.Id:- mbmcaudit@gmail.com
मुख्य लेखापरीक्षक यांचे कार्यालय
जा.क्र.मनपा/मुलेप/ ५१ /2022-23
दि.20 /09 /2022

<u>प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप-मुख्यलेखापरीक्षक मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेसमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.</u>

श्री. चंदन स सिंग
A-108, सिध्दि विनायक बिल्डिंग नं-01
Mbmc ward ऑफिस जवळ
तलाव रोड, भाईंदर (पु) 401105 ......अपिलार्थी

विरुध्द

जनमाहिती अधिकारी तथा
सहा.लेखापरीक्षक, लेखापरीक्षण विभाग ......प्रतिवादी

अपिलार्थी श्री. चंदन स. सिंग, A-108, सिध्दि विनायक बिल्डिंग नं-01 Mbmc ward ऑफिस जवळ तलाव रोड, भाईंदर (पु) 401105 यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 नुसार प्रभाग क्र.04 मध्ये केलेल्या लेखापरीक्षण अहवाल व मेमोज इ बाबतचा माहिती अधिकार अपिल अर्ज दि. 09/09/2022 रोजी केला होता. त्याअनुषंगाने सदर अपिलाची सुनावणी दि.16/09/2022 रोजी दुपारी 12.00 वाजता प्र.मुख्य लेखापरीक्षक यांच्या कार्यालयात ठेवण्यात आली होती. जा.क्र.मनपा/मुलेप/मा.अ./47/2022-23, दि. 07/09/2022 अन्वये श्री.चंदन स. सिंग, अपीलार्थी यांना कळविले आहे.

21-9-2022

**अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचा तपशिल :-**

लेखापरीक्षण कार्यालयाने प्रभाग क्र.04 मध्ये केलेल्या लेखापरीक्षण अहवाल, मेमोज इ. बाबतची मागील तीन वर्षाची माहिती मागविलेली होती.

**अपिल दाखल करण्याचे कारण:-**

माहिती अधिकारात मागितलेली माहिती मिळाली नसल्याने अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा सहा. लेखापरीक्षक लेखापरीक्षण कार्यालयातील जनमाहिती अधिकारी यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.16/09/2022 रोजी 12.00 दुपारी वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र/मनपा/मुलेप/47/2022-23, दि. 07/09/2020 रोजी पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यानुसार सदर सुनावणीस खालीलप्रमाणे अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

१) श्री. चंदन स. सिंग (अपिलार्थी)

२) सहा. लेखापरीक्षक तथा जनमाहिती अधिकारी, लेखापरीक्षण विभाग

**जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तीवाद :-**

लेखापरीक्षण विभागामार्फत संपुर्ण विभागाचे ऑडीट करण्यात येते. व त्याचा स्वतंत्र लेखापरीक्षण अहवाल तयार करणेत येतो. तसेच विभागाने सन 2003-04 ते 2015-16 पर्यंत केलेले अहवाल मनापाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेले आहे. सदर अहवाल संकेतस्थळावरुन उपलब्ध करुन घेणेबाबत माहिती अधिकार अर्जाच्या अनुषंगे अपिलार्थीस लेखी पत्राव्दारे कळविले आहे.

**अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तीवाद :-**

अपिलार्थी यांनी सुनावणीमध्ये प्रभाग क्र.04 चे लेखापरीक्षण केल्याची तसेच त्यासंबंधी दिलेले मेमोज इत्यादीबाबत माहिती मागविलेली आहे. तसेच सद्यस्थितीमध्ये जी माहिती उपलब्ध आहे ती देणेबाबत मागणी केली आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

## -: निर्णय :-

लेखापरीक्षण विभागामार्फत मनपाच्या विविध विभागाचे लेखा परिक्षण करुन वार्षिक अहवाल तयार करण्यात येतो. विभागाने सन 2016-17 पर्यंतचे लेखा परीक्षण पुर्ण केलेले आहे. तथापि अपिलार्थी यांनी प्रभाग क्र.04 बाबतची स्वतंत्र लेखापरीक्षण केल्याची माहिती मागविली आहे. तरी स्वतंत्र प्रभागनिहाय लेखापरीक्षण अहवाल तयार केला जात नसुन एकत्रित सर्व विभागाचे लेखापरीक्षण करुन अहवाल तयार केला जातो. तथापि जनमाहिती अधिकारी तथा सहा. लेखापरीक्षक यांनी अपिलार्थी यांना अपेक्षित असलेली मालमत्ता कर, पाणी पुरवठा व अतिक्रमण विभागाचे आक्षेपाबाबतची मागील तीन वर्षातील माहिती नियमानुसार शुल्क आकारुन 7 दिवसात देणेत यावी.

तसेच आपणास आवश्यक असल्यास विभागाकडे उपलब्ध असलेले सन 2003-04 ते 2016-17 पर्यंतचे लेखापरीक्षण अहवाल मनपाच्या **www.mbmc.gov.in** या संकेतस्थळावरुन उपलब्ध करुन घेण्यात यावे. तरी सदर अपिल अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

सदर आदेशाविरुध्द अपिल करावयाचे असल्यास मा. राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, 5 वा मजला, दालन क्र.528, कोकण भवन, सी. बी.डी. बेलापुर, नवी मुंबई - 400614 यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासुन 90 दिवसांच्या आत अपिल दाखल करता येईल.

(मंजिरी डिमेलो)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उप-मुख्यलेखापरीक्षक
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति

1) श्री. श्री. चंदन स सिंग
A-108, सिध्दि विनायक बिल्डिंग नं-01
Mbmc ward ऑफिस जवळ
तलाव रोड, भाईंदर (पु) 401105
2) जनमाहिती अधिकारी तथा सहा. लेखापरीक्षक
लेखापरीक्षण विभाग.

माहितीचा अधिकर अधिनियम 2005 कलम 19(1) अन्वये दाखल प्रथम अपिलाची सुनवाणी
अपील (प्रथम) क्र., 01 दि. 16 /09/2022, वेळ - दुपारी 12.00 वाजता.

१) श्री. चंदन सिंग
A-108, सिद्धी विनायक इ.नं.09
mbmc ward ऑफिस जवळ,
गाव रोड, भा(पू)

..... अपिलार्थी

**विरुध्द**

२) जनमाहिती अधिकारी तथा
**लेखापरीक्षा अधिकारी, लेखापरीक्षण विभाग**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

..... प्रतिवादी

सदर सुनावणीसाठी खालील अधिकारी व अपिलार्थी उपस्थित होते.

| अ.क्र | उपस्थित नाव | सही |
|---|---|---|
| 1 | श्रीमती. चारुशिला खरपडे<br>जनमाहिती अधिकारी | [illegible] |
| 2 | श्री. श्री. चंदन सिंग<br>अपिलार्थी | [illegible] |